**इथिओपिया मध्ये संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला पंतप्रधानांचे संबोधन (17 डिसेंबर 2025)**

17 डिसेंबर 2025

पंतप्रधानांनी आज इथिओपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेनाला संबोधित केले.इथिओपियाला पहिल्या द्विपक्षीय भेटीवर आलेल्या पंतप्रधानांना देण्यात आलेला हा एक विशेष सन्मान होता.

2. पंतप्रधानांनी आपल्या संबोधनाची सुरूवात इथिओपियाच्या नेत्यांना भारताच्या लोकांकडून मैत्रीच्या शुभेच्छा व सदिच्छा देऊन केली. संसदेला संबोधित करणे आणि लोकशाहीच्या या मंदिरातून इथिओपियातील शेतकरी, उद्योजक, महिला आणि देशाचे भविष्य घडवणारे तरुण अशा सामान्य जनतेशी संवाद साधण्याची संधी मिळणे ही मोठी गौरवाची गोष्ट आहे, असे त्यांनी नमूद केले. निशान ऑफ इथिओपिया हा सर्वोच्च सन्मान दिल्याबद्दल त्यांनी इथिओपियाच्या जनतेचे आणि सरकारचे आभार मानले. द्विपक्षीय संबंधांचे महत्त्व लक्षात घेता, या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील प्राचीन संबंधांना धोरणात्मक भागीदारीचा दर्जा देण्यात आल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले.

3. भारत आणि इथिओपिया यांच्यामधील सभ्यता कालीन संबंधांची आठवण करून देत, उभय देश हे प्राचीन ज्ञान आणि आधुनिक महत्त्वाकांक्षा यांचा संगम आहेत असे मत पंतप्रधानांनी व्यक्त केले. याबाबतीत, भारताच्या' ‘वंदे मातरम्’” या राष्ट्रीय गीतात आणि इथिओपियाच्या राष्ट्रगीतात भूमीला ‘माता’ म्हणून गौरविले आहे असे त्यांनी नमूद केले. दोन्ही देशांच्या सामायिक संघर्षाचा उल्लेख करत, पंतप्रधानांनी1941 मध्ये इथिओपियाच्या स्वातंत्र्यासाठी भारतातील सैनिकांनी इथिओपियन बांधवांसोबत खांद्याला खांदा लावून लढलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. इथिओपियाच्या जनतेच्या बलिदानाचे प्रतीक असलेल्या अदवा विजय स्मारकाला आदरांजली वाहण्याची संधी मिळणे ही त्यांच्यासाठी गौरवास्पद बाब होती अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

4.भारत-इथिओपिया यांच्यातील भागीदारी वृद्धिंगत व मजबूत करण्याबाबतची भारताचीवचनबद्धता पंतप्रधानांनी व्यक्त केली. या संदर्भात, त्यांनी इथियोपियाचा विकास व समृद्धी यामध्ये भारतीय शिक्षक व व्यावसायिकांच्या असलेल्या योगदानाची आठवण करुन दिली. त्यांनी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, अन्न सुरक्षा आणि नवोपक्रम या क्षेत्रातील भारताच्या’ विकासाविषयी माहिती देऊन , इथिओपियाच्या ’प्राधान्यानुसार यापुढेही इथिओपियाला विकासात साहाय्य करायला भारत’ तयार आहे असे सांगितले. "वसुधैव कुटुंबकम" (संपूर्ण जग एक कुटुंब आहे) या आपल्या तत्त्वानुसार मानवतेसाठी भारताच्या’ बांधिलकीचा उल्लेख करत, कोविड महामारीच्या काळात भारत इथिओपियाला लस पुरवठा करू शकला ही भारताच्या दृष्टीने विशेष बाब आहे असे ते म्हणाले.

5. पंतप्रधानांनी अधोरेखित केले की, भारत आणि इथिओपिया, दक्षिण गोलार्धातील देश म्हणून, विकसनशील देशांसाठी एकत्रितपणे आवाज उठवला पाहिजे. दहशतवादाविरोधातील लढाई मजबूत करण्यात साथ दिल्याबद्दल त्यांनी इथिओपियाचे आभार मानले.

6. आफ्रिकन युनियनचे मुख्यालय असलेल्या अदिस अबाबा ची आफ्रिकन एकतेची स्वप्ने साकार करण्यात असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करत, पंतप्रधान म्हणाले की आपल्या अध्यक्षतेदरम्यान आफ्रिकन युनियनला G20 चा कायमस्वरूपी सदस्य म्हणून समावेश करता आला, याचा भारताला अभिमान आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, आपल्या सरकारच्या 11 वर्षांच्या कार्यकाळात भारत–आफ्रिका संबंध कित्येक पटींनी वृद्धींगत झाले आहेत आणि दोन्ही देशांच्या राज्य आणि केंद्र सरकारमधील प्रमुख नेत्यांचे 100 पेक्षा जास्त दौरे आयोजित करण्यात आले आहेत. त्यांनी अफ्रिकेच्या' विकासाबाबत भारताच्या' वचनबद्धतेचा उल्लेख केला आणि जोहान्सबर्ग येथे झालेल्या G-20  शिखर परिषदेतील 'अफ्रिका कुशलता वृद्धी उपक्रम' हा अफ्रिका खंडातील लाखो लोकांना प्रशिक्षित करण्याबाबतच्या आपला प्रस्ताव  अधोरेखित केला.

7. जगाच्या दक्षिण गोलार्धातील देश आता आपले भविष्य स्वतःच घडवत आहेत असे सांगून,  भारताला' आपला विकासाचा प्रवास आपल्या सहयोगी लोकशाही देशासमोर मांडण्याची संधी दिल्याबद्दल पंतप्रधानांनी माननीय' सभापतींचे आभार मानले.

ॲडिस अबाबा

17 डिसेंबर 2025